# महिला सक्षमीकरण : सरकारी योजनांचा चिकित्सक अभ्यास

**प्रा. भारती अ.मुडे** ,गृहविज्ञान ,कमला कॉलेज, कोल्हापूर.

---

**गोषवारा**:-

महिला सक्षमीकरण म्हणजे व्यक्ती आणि समुदाय म्हणून महिलांचे आर्थिक , सामाजिक,राजकीय आणि शैक्षणिक सक्षमीकरण:

स्त्रियांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने, महिलांच्या सक्षमीकरणासाठी सरकारने विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यांचा विकासासाठी प्राधान्याने या योजना शासन पातळीवर राबविण्यात येतात. यामधील महिला आर्थिक सक्षमीकरणाची क्षमता आणि महत्त्व लक्षात आले होते, म्हणूनच ते साध्य करण्यासाठी ते मिशन मोडमध्ये काम करीत आहे.भारत सरकारने महिलांच्या सक्षमीकरणाच्या उद्देशाने वेळोवेळी अनेक योजना सुरू केलेल्या आहेत. या योजना महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी जीवनमान सुधारण्यासाठी संधीप्रदान करतात.या संशोधन लेखात भारत सरकारच्या काही योजना त्यांचा प्रभाव अंमलबजावणी यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**बीजशब्द** : महिला सक्षमीकरण,शहरी,ग्रामीण महिला,, सरकारी योजना आर्थिक स्वावलंबन महिला सशक्तिकरण, सहभागीता

**प्रस्तावना**:-

महिला सक्षमीकरण हा कोणत्या देशाचा सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना लागू केल्या आहेत. ज्यामध्ये शिक्षण, आरोग्य,स्वयंरोजगार,आर्थिक स्वायत्तता,सुरक्षितता यासंबंधी उपाययोजना केल्या जातात या संशोधन निबंधात भारत सरकारच्या विविध योजना त्यांचा प्रभाव अंमलबजावणी यांचा अभ्यास करण्यात आला आहे. आधुनिक स्त्री दोन अगदी टोकाच्या भूमिका एकाच वेळी पार पाडत असते. गृहिणी माहेरची लेक व सासरची सून एक महिला म्हणून बाहेरच्या जगात वावरते. घरात मात्र जुन्या रीतीरीवाजाप्रमाणे वागावे लागते. एकाच वेळी ती मुलींची आई असते,नवऱ्याची बायको असते,सून असते, या सगळ्या भूमिकांमुळे तिची दमछाक होते. व याबरोबर मानसिक उत्तार चढाव तिला सहन करावे लागते.

सप्टेंबर 1919 मध्ये चौथा जागतिक महिला परिषदेत स्त्रियांच्या प्रगतीचा धोरणास अनुक्रमा देण्यात आला. शांतता, विकास व क्षमता या उद्दिष्ट करिता स्त्रियांच्या दर्जा, समानता शिक्षण, आरोग्य, संरक्षण, उत्पादन क्षमता इ. प्रश्न बाबत अनेक धोरणात्मक उद्दिष्टे ठरवली गेली. त्यानुसार स्त्रियांची दारिद्र्य कमी करणे, स्त्रिया व मुलींमध्ये शैक्षणिक समानता आरोग्य सेवेचा दर्जा वाढविणे, श्री स्वातंत्र्यास उत्तेजना देणे व तसेच साधने उपलब्ध करून देणे कौटुंबिक जबाबदाऱ्या स्त्री-पुरुषांनी समप्रमाणात वाटून घेणे, स्त्रियांना स्वातंत्र्य देणे, स्त्रियांना कायद्याचे वाढती संरक्षण देणे, इत्यादी ठराव पास झाले.त्याचप्रमाणे समान सुधारणा विना विलंब व्हावी असे ठरले.

**महिला शक्ती वितरण योजना**

महिला सक्षमीकरण योजना ही केंद्र सरकार आणि राज्य सरकारने भारतातील महिलांना शिक्षण करण्यासाठी सुरू केलेली योजना आहे. महिला सक्षमीकरणासाठी सरकारी योजना भारत सरकारच्या प्रमुख प्राधान्यापैकी एक आहे सरकारने विविध मंत्रालय आणि विभागाद्वारे महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना सुरू केल्या आहेत या योजना दोन प्रकारात वर्गीकरण करता येतात

१) स्थिर महिला सक्षमीकरण योजना:-या अशा योजना आहेत ज्या सरकारकडून कायमस्वरूपी राबविल्या जातात.

२) गतिमान महिला सक्षमीकरण योजना:-या अशा योजना आहेत ज्या विविध कालावधीसाठी राबविला जातात.

**उद्दिष्ट्ये** :-

१)महिला सक्षमीकरणाशी संबंधित सरकारच्या विविध योजनांचा अभ्यास करणे

२) महिला सक्षमीकरणाची गरज जाणून घेणे

३) विविध पैलू मध्ये या योजनांची भूमिका आणि महत्त्व अभ्यासणे

४) महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे

५)महिला सक्षमीकरणासाठी उपाय योजना सुचविणे

६) महिला सक्षमीकरण योजनेचा आढावा घेणे

५) ग्रामीण शहरी भागातील महिलांना कायमस्वरूपी रोजगार निर्माण करणे.

भारतातील महिला सक्षमीकरण योजना

-महिला बचत गट(SHG) योजना :-महिला बचतगट योजना ही एक सरकारी योजना आहे.ज्यांच्या उद्देश गरीब कुटुंबातील महिलांना आर्थिक मदत करणे आहे.

-महिला उद्योजकता निधी योजना:- भारत सरकारने 2020 मध्ये महिला उद्योजकता निधी योजना सुरू केली आहे. ज्या महिला उद्योजकांना व्यवसाय सुरू करावयाचे आहे. परंतु व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक निधी नाही त्यांच्यासाठी महिला उद्योजकता निधी योजना उपयुक्त ठरू शकते.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजना :- प्रधानमंत्री मातृवंदन योजना ही 2019 मध्ये सुरू करण्यात आलेली एक सरकारी योजना आहे. या योजनेचा उद्देश घरगुती आणि स्तनपान देणाऱ्या महिलांना किंवा मातांना त्यांच्या आरोग्याचे आणि त्यांच्या मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आर्थिक मदत करणे आहे.

**महिला आणि बालविकास (WCD) मंत्रालयांचा काही योजना पुढील प्रमाणे**

-बेटी बचाव बेटी पढाव योजना:-ही योजना 2015 मध्ये सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेचा उद्देश मुलींना वाचवणे,आणि तिला शिक्षित करणे आहे.

-सुकन्या समृद्धी योजना:-ही योजना 2015 मध्ये सुरू करण्यात आलेली एक सरकारी योजना आहे.या योजनेच्या उद्देश मुलींना आर्थिक मदत देणे होय.

-इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना:-इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनाही 2010 मध्ये सुरू करण्यात आलेली एक सरकारी योजना आहे.या योजनेचा उद्देश पहिल्यांदाच गर्भवती असलेल्या महिलांना आर्थिक मदत प्रदान करणे आहे.

-महिला शक्ती केंद्र योजना:-देशातील सर्व जिल्हा मध्ये महिला सक्षमीकरण केंद्रे उपलब्ध करून देणे या योजनेचे उद्दिष्ट आहे.ही केंद्र महिलांसाठी एक -टॉप सेवा प्रदान करतील त्यामध्ये सरकारी योजना आणि कार्यक्रमाची माहिती आणि प्रवेश समावेशक सेवा, कौशल्य विकास, प्रशिक्षण इत्यादीचा समावेश असेल

प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना:-17 सप्टेंबर 2023 रोजी लॉन्स करण्यात आले.या योजने अंतर्गत रोजगारासाठी मोफत कौशल्य प्रशिक्षण आणि स्वस्त व्याजदराने कर्ज दिले जाते. या योजनेचे उद्दिष्ट तीन लाख पारंपरिक कारागीर आणि कारागिरासह, सुतार,बोट बनविणारा,लोहार मुर्तिकार,सोनार,कुंभार,चांभार,टोपली,चटई झाडू बनविणारा,विणकर,नाव्ही सिम्पली,हातअवजारे व साधने यांचा वापर करून तसेच हाताने काम करणाऱ्या पारंपारिक कारागीर आणि हस्तकलींच्या लोकांना ओळख प्राप्त करून देण्यासाठी आणि त्यांना सर्वांगीण आधार देऊन त्यांचा विकास करण्यासाठी भारत सरकारने सुरू केलेली योजना आहे.

सन 2019 20 आर्थिक वर्षापासून राज्यात कार्यान्वित करण्यासाठी शासनाचा नवीन औद्योगिक धोरण

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना (PMEGP)

सध्या स्थितीत कार्यरत असलेल्या ही योजना केंद्रा आणि राज्यस्तरावर उद्योग विभागाच्या अधिपत्याखाली उद्योग संचालक मुंबई हे योजनेचे प्रमुख अंमलबजावणी संस्था म्हणून कार्यवाही करतील

या योजनेचे उद्दिष्टे:- महिलांना स्वयंपूर्ण आत्मनिर्भर बनविण्यासाठी त्यांचे स्वयंरोजगार प्रकल्प राज्य शासनाच्या आर्थिक सहाय्यातून सुलभतेने स्थापित होऊन पुढील पाच वर्षात सुमारे एक लाख सूक्ष्म लघु उपक्रम स्थापित होणे.

महिला शक्ती वितरण योजना

महिला सक्षमीकरण योजना ही केंद्र सरकार आणि राज्य सरकारने भारतातील महिलांना शिक्षण करण्यासाठी सुरू केलेली योजना आहे. महिला सक्षमीकरणासाठी सरकारी योजना भारत सरकारच्या प्रमुख प्राधान्यापैकी एक आहे सरकारने विविध मंत्रालय आणि विभागाद्वारे महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना सुरू केल्या आहेत या योजना दोन प्रकारात वर्गीकरण करता येतात

१) स्थिर महिला सक्षमीकरण योजना:-या अशा योजना आहेत ज्या सरकारकडून कायमस्वरूपी राबविल्या जातात.

२) गतिमान महिला सक्षमीकरण योजना:-या अशा योजना आहेत ज्या विविध कालावधीसाठी राबविला जातात

**निष्कर्ष**:-

भारतातील महिला सक्षमीकरण योजनांचा उद्देश महिलांना संसाधने संधी आणि संरक्षणात समान प्रवेश मिळावा हे सुनिश्चित करणे आहे. सरकार तसे स्वयं सेवी संस्थाद्वारे अनेक विविध कार्यक्रम आणि उपक्रम चालवले जातात. जे हे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कार्य करतात. अजून बरीच प्रगती व्हायचे असताना 2021 मध्ये भारतातील महिला सक्षमीकरणासाठी योजनांचा खूप मोठा पल्ला गाठला आहे आणि दरवर्षी लाखो महिलांच्या जीवनावर प्रभाव पडत आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

१) संसाधनाची संकल्पना-डॉक्टर सौ लीना सुनील कांढरकर

२) आधुनिक गृह व्यवस्थापन:- डॉ वैरागडे, प्रा. लाटकर .

३) सामुदायिक विकास, विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण :-डॉ. उज्वला वैरागडे / प्रा. विद्युल्लता मुळे

४) Website – *www.myscheme.gov.in*

५) *www.planmaharashtra.gov.in*